# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः15.10.2024** **वारःमंगळवार**

---

1. मुंबईतल्या पाच प्रवेश मार्गांवरचा पथकर हलक्या वाहनांसाठी माफ करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
2. पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील रेल्वे मार्गिकांच्या कामांनाही मंत्रिमंडळाची मान्यता
3. पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये राज्याला पाच पुरस्कार; उत्कृष्ट महानगरपालिका श्रेणीमध्ये पुणे महानगरपालिका तिसरी
4. गडचिरोली जिल्ह्यातील जहाल नक्षलवादी दांपत्याची पोलिसांसमोर शरणागती आणि
5. हरहुन्नरी अभिनेते अतुल परचुरे काळाच्या पडद्याआड; कलाविश्वात शोकभावना

**<u>राज्य मंत्रिमंडळ निर्णय</u>**

मुंबईतल्या पाच प्रवेश मार्गांवरील पथकर हलक्या वाहनांसाठी माफ करण्याचा निर्णय काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. पथकरातून सवलत दिल्यामुळे राज्य रस्ते विकास महामंडळाला द्याव्या लागणाऱ्या भरपाईसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. आगरी समाजासाठी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णयही कालच्या बैठकीत घेण्यात आला.

दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदी जोड योजना, दमणगंगा-वैतरणा-गोदावदी नदी जोड योजना तसंच वैजापूर तालुक्यातल्या शनीदेवगाव उच्चपातळी बंधाऱ्यालाही मान्यता देण्यात आली. दमणगंगा-एकदरे-गोदावरी या योजनेतून मराठवाड्यातील 10 हजार 11 हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होईल. तर दमणगंगा वैतरणा गोदावरी नदी जोड योजनेचा लाभ नाशिक जिल्ह्यातला अवर्षणग्रस्त सिन्नर तालुका आणि मराठवाड्यातल्या जायकवाडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्राला होणार आहे. शनीदेवगाव उच्चपातळी बंधाऱ्यामुळे 1 हजार 978 हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळेल.

पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला आणि नळ स्टॉप-वारजे-माणिकबाग या मेट्रो मार्गिकांना मान्यता देण्यात आली. या मार्गिकांची लांबी 31 किलोमीटर असून त्यामध्ये 28 उन्नत स्थानकं आहेत. यासाठी 9 हजार 817 कोटी 19 लाख रुपये खर्चाला मान्यता देण्यात आली.

पुणे जिल्ह्यातली राज्य शेती महामंडळाची 131 हेक्टर जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करण्याचा निर्णयही काल घेण्यात आला. ठाणे तालुक्यातल्या पाचपाखाडी इथली जमीन प्रशासकीय भवनासाठी ठाणे महानगरपालिकेस देण्याचा आणि खिडकाळी इथली जमीन हायब्रिड स्किल विद्यापीठासाठी विनामूल्य देण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठी भाषेविषयी जनजागृतीसाठी पंधरवडा साजरा करण्याचा, तसंच महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाला पद्मविभूषण रतन टाटा यांचं नाव देण्याचा निर्णयही काल मंत्रिमंडळानं घेतला.

**<u>जल पुरस्कार</u>**

पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांची घोषणा केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी काल नवी दिल्लीत केली. उत्कृष्ट राज्यांच्या श्रेणीत ओडिशाला प्रथम, उत्तर प्रदेशला द्वितीय; तर गुजरात आणि पुद्दुचेरीला संयुक्तरित्या तिसरा पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राला विविध विभागात एकंदर 5 पुरस्कार जाहीर झाले आहेत. उत्कृष्ट महानगरपालिका श्रेणीमध्ये पुणे महानगर पालिकेला तिसरा क्रमांक; तर नागरी संस्थांच्या श्रेणीत पुण्यातल्याच बायफ विकास संशोधन फाऊंडेशनला पहिला आणि नाशिकच्या युवा मित्रला दुसरा पुरस्कार जाहीर झाला आहे. पाणी वापर करणाऱ्या संघटनांच्या श्रेणीत बुलडाणा जिल्ह्यातल्या पेनटाकळी प्रकल्पाला पहिला; तर उद्योगांच्या

श्रेणीत यवतमाळच्या रेमंड युको डेनिम कंपनीला तिसरा पुरस्कार जाहीर झाला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते येत्या 22 ऑक्टोबरला नवी दिल्लीत या पुरस्कारांचं वितरण होणार आहे.

**<u>सुंदरशाळा</u>**

'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानातून विद्यार्थीपूरक बदल घडत असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल सांगितलं. शाळांचा दर्जा सर्वोत्तम राखण्यास प्राधान्य दिलं जात असल्याचं ते म्हणाले. या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातल्या विजेत्या शाळांना काल सन्मानित करण्यात आलं; त्यावेळी ते बोलत होते. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी शासन सकारात्मक निर्णय घेत असल्याचं शिंदे यांनी यावेळी सांगितलं.

**<u>बसस्थानक-यवतमाळ</u>**

यवतमाळ इथं महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीनं बांधण्यात आलेल्या बसस्थानकाचं लोकार्पण काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून झालं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री संजय राठोड हेही या सोहळ्याला दूरस्थ माध्यमातून उपस्थित होते. प्रातिनिधीक स्वरूपात नवीन बसस्थानकातून एक बस रवाना करण्यात आली.

**<u>भाडेवाढ मागे</u>**

दिवाळीत हंगामामध्ये केली जाणारी भाडेवाढ मागे घेण्याचा निर्णय एसटी महामंडळानं घेतला आहे. 25 ऑक्टोबर ते 24 नोव्हेंबर दरम्यान ही भाडेवाढ होणार होती. यासंदर्भातलं पत्रक शुक्रवारी महामंडळानं प्रसिद्ध केलं होतं. हे पत्रक मागे घेत असल्याचं एसटी महामंडळानं काल जाहीर केलं.

**<u>जाहिरात</u>**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागासाठी अंशकालीन वार्ताहर नेमण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यासंदर्भात सविस्तर जाहिरात न्यूजऑन एआयआर डॉट कॉम या संकेतस्थळावर वेकन्सीज या सदराखाली पाहता येईल. तसंच इच्छुक उमेदवार पुणे वृत्त विभागाच्या 020 255 32 162 या क्रमांकावर देखील संपर्क साधू शकतात.

**<u>भोसले नाट्यगृह-कोल्हापूर</u>**

कोल्हापूरमधल्या संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहांच्या पुनर्बांधणीचं भूमीपूजन काल पालकमंत्री हसन मुश्रीफ आणि खासदार छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते करण्यात आलं. यावरशी 8 ऑगस्टला हे नाट्यगृह आगीच्या भक्ष्यस्थानी पडलं होतं. कोल्हापूरकरांच्या जिव्हाळ्याचं हे नाट्यगृह दीड वर्षात पुन्हा दिमाखात उभं राहील, असा विश्वास मुश्रीफ यांनी व्यक्त केला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संदेशांचं वाचन करण्यात आलं.

**<u>नक्षलवादी-गडचिरोली</u>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुक्यात सक्रीय जहाल नक्षलवादी दांपत्यानं काल केंद्रीय राखीव दल आणि जिल्हा पोलिसांसमोर शरणागती पत्करली. वरुण राजा मुचाकी उर्फ उंगा उर्फ मनिराम उर्फ रेंगू आणि रोशनी विजया वाच्छामी अशी त्यांची नावं आहेत. त्यांच्यावर 8 लाख आणि 2 लाख रुपयांची बक्षीसं लावण्यात आली होती. नक्षल्यांनी हिंसेचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात येण्याचं आवाहन पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी केलं आहे.

**<u>निधन</u>**

आपल्या निखळ अभिनयानं रसिकांच्या मनाचा ठाव घेणारे हरहुन्नरी अभिनेते अतुल परचुरे यांचं काल मुंबईत निधन झालं. ते 57 वर्षांचे होते. प्रामुख्यानं विनोदी भूमिका साकारणाऱ्या अतुल परचुरे यांनी बालरंगभूमीपासून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. नातीगोती, तरुण तुर्क म्हातारे अर्क, वासूची सासू, व्यक्ती आणि वल्ली अशी अनेक नाटकं तसंच नवरा माझा नवसाचा, नारबाची वाडी, यासारख्या चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. 'कापूस कोंड्याची गोष्ट' या नाटकातील त्यांच्या भूमिकेला रसिकांनी भरभरून दाद दिली. मराठी बरोबरच अनेक हिंदी चित्रपटांमध्येही त्यांनी भूमिका केल्या. काही काळापूर्वी कर्करोगाशी सामना करुन ते त्यातून यशस्वीपणे

बाहेर पडले होते. अलिबाबा आणि चाळिशीतले चोर हा अतुल परचुरेंचा शेवटचा चित्रपट ठरला. परचुरे यांच्या निधनामुळं मराठी- हिंदी चित्रपट आणि नाट्यसृष्टीवर शोककळा पसरली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवरांनी परचुरे यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. परचुरे यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी मुंबईत शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**खेळाडू सन्मान**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना काल राज्य सरकारतर्फे धनादेश आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते हे सत्कार करण्यात आले. ऑलिम्पिक नेमबाजी स्पर्धेत कांस्य पदक पटकावणारा स्वप्निल कुसळे याला दोन कोटी रुपये आणि त्याच्या प्रशिक्षक दिपाली देशपांडे यांना 20 लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. पॅराऑलिम्पिकपटू सचिन खिलारी, त्याचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण; तसंच 45व्या बुद्धीबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत चमक दाखवणारे राज्यातले बुद्धीबळपटू विदीत गुजराथी आणि दिव्या देशमुख या खेळाडूंचा आणि त्यांच्या मार्गदर्शकांना काल सन्मानित करण्यात आलं.

**पाऊस**

सांगली जिल्ह्यात तसंच रत्नागिरीमध्येही काल मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. पुणे शहराच्या काही भागातही काल रात्री पावसाच्या जोरदार सरी आल्या. बुलडाणा जिल्ह्याला नुकत्याच झालेल्या परतीच्या पावसाचा मोठा फटका बसला असून अनेक गावांत पिकांचं मोठं नुकसान झालं आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्यात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.